# परिस स्पर्श मेंटॉर-मेंटी योजने अंतर्गत व्यंकटेश मध्ये कार्यशाळा संपन्न

परिस स्पर्श मेंटॉर-मेंटी योजने अंतर्गत  इतर महाविद्यालयांना त्यांच्या प्रक्रियेमध्ये मार्गदर्शकाची भूमिका पार पाडण्यासाठी इचलकरंजी परिसरातील पाच महाविद्यालयांचे मेंटॉर म्हणून श्री व्यंकटेश महाविद्यालय काम करत आहे. या योजने अंतर्गत 'सॉफ्ट स्किल्स आणि इंटरव्यू टेक्निक्स' या विषयावर दोन दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. माननीय प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांचे मार्गदर्शन व डॉ. एस. एन. जरंडीकर यांचे समन्वयाने आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मदतीने पार पडला. दोन दिवसांच्या या प्रशिक्षणात डीकेटीई मधील प्राध्यापिका डॉ. सीमा मालू व डीवाय पाटील स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट, कोल्हापूर चे प्राध्यापक श्री. व्यंकटेश बडवे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. प्रथम दिवशी स्वॉट ॲनालिसिस, लीडरशिप क्वालिटी आणि बॉडी लँग्वेज या विषयावर प्रत्यक्ष कृतीद्वारे प्रशिक्षण घेतले गेले तर प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी ग्रुप डिस्कशन, इंटरव्यू टेक्निक्स या विषयावर प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले गेले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने यांनी ज्या महाविद्यालयांचे नॅक मानांकन 'ए' आणि 'ए प्लस' म्हणजेच सर्वोत्कृष्ट मानांकन आहे  अशा महाविद्यालयांना इतर महाविद्यालयांचे मेंटॉर म्हणून विद्यापीठामार्फत नेमणूक करण्यात आली आणि आपल्या महाविद्यालयास मेंटॉर म्हणून भूमिका पार पाडण्यासाठी संधी मिळाली याचा सार्थ अभिमान आहे असे मत व्यक्त केले. या प्रशिक्षणात, दत्ताजीराव कदम आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, इचलकरंजी, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय रूकडी, इचलकरंजी शिक्षण शास्त्र महाविद्यालय इचलकरंजी व श्री व्यंकटेश महाविद्यालय येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. या प्रशिक्षणाचे आयोजन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास व नोकरी विषयक कौशल्य विकसित करण्यासाठी करण्यात आले होते. त्यास विद्यार्थ्यांनी मनापासून दाद दिली. उत्कृष्ठ मार्गदर्शन व नियोजनामुळे विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे

स्वागत केले.


Research and learn about the company
Try mock interviews
Prepare for the question you can ask the interviewer
Do some salary research and be prepared to discuss salary
Smile and make eye contact
10 Best tips to prepare for a Job Interview in 2025
Review the job description
Prepare to answer the most commonly asked question
Dress appropriately
Arrive early
Don't lie in a job interview
SHRI VENKATESH MAHAVIDYALAYA,